**भुसंपादन प्रकरण १६/२००५-२००६ मौजा कोलखेड,
ता. लोणार जि. बुलढाणा येथील ६६ भुधारकांचे
पुनर्वसन अनुदान प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : आरपीए-२०१८/प्र.क्र.६४/र-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक : २८ मार्च २०१८

पहावे: - १) महसूल व वन विभाग ,परिपत्रक क्रं. आरपीए-१०९८/प्र.क्र.४०७/र-१ दि.२९/०१/१९९९
२) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्रं. उपायु अ.का./भु.सं. २/ पुनर्व/मौजा कोलखेड/ कावि-२९५/१८ दि. २९/०१/२०१८.

प्रस्तावना:

भुसंपादन प्रकरण १६/२००५-२००६ मौजा कोलखेड, ता. लोणार जि. बुलढाणा येथील घोषित निवाड्यानुसार ६६ भुधारकांना पुनर्वसन अनुदानापोटी देय रक्कम रु. १,३४,०७,२८३ /- अदा करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांनी संदर्भ क्र २ अन्वये शासन मंजुरीसाठी सादर केला आहे. भुसंपादन प्रकरण १६/२००५-२००६ बाबत श्री रामभाऊ राजाराम खोडके व इतर अशा ७ भुधारकांनी व्याजासह पुनर्वसन अनुदान मिळण्याबाबत दाखल केलेल्या रिट याचिका क्र.५६४८/२०१५ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दि. २७/०६/२०१७ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णयान्वये १२% व्याजाची आकारणी करुन व्याजासह पुनर्वसन अनुदानाची रक्कम अदा करण्याबाबत निदेश दिले आहेत. उपरोक्त बाब विचारात घेता,भुसंपादन प्रकरण १६/२००५-२००६ मौजा कोलखेड, ता. लोणार जि. बुलढाणा येथील श्री रामेश्वर उद्धव तनपुरे यांच्यासह एकुण ६६ भुधारकांना अंतीम निवाड्यानुसार पुनर्वसन अनुदानापोटी रु. १,३४,०७,२८३ /- एवढी रक्कम अदा करण्याबाबत शासन परिपत्रक दि. २९/०१/१९९९ अन्वये वित्तीय मर्यादा विहित केल्यानुसार सदर रक्कम १ कोटीपेक्षा जास्त असल्याने मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

भुसंपादन प्रकरण १६/२००५-२००६ मौजा कोलखेड, ता. लोणार जि. बुलढाणा मध्ये दि. ३०/३/२००९ रोजी जाहीर केलेल्या निवाड्यानुसार श्री. रामेश्वर उद्धव तनपुरे यांच्यासह एकुण ६६ भुधारकांना पुनर्वसन अनुदानाची रु. १,३४,०७,२८३ /- एवढी देय रक्कम अदा करण्यास महसूल व वन विभाग,परिपत्रक क्रं. आरपीए-१०९८/प्र.क्र.४०७/र-१ दि.२९/०१/१९९९ अन्वये वित्तीय मर्यादा विहीत केल्यानुसार शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदरचा शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक. २०१८०३२८१६५४३५१९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Shivaji P Karwar

Digitally signed by Shivaji P Karwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46ec07554eac404147684ed8b27adc8a1c2a78fe8ffea3c9dd01377e25f76a36, cn=Shivaji P Karwar
Date: 2018.03.28 16:58:45 +05'30'

(शि.पां.कारवार)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत:

१) विभागीय आयुक्त,अमरावती
२) जिल्हाधिकारी ,बुलढाणा
३) जिल्हा पुनर्वसन अधिकारी ,बुलढाणा
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/लेखापरिक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
५) जिल्हा कोषागार अधिकारी, बुलढाणा
६) मा. अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक
७) कार्यासन ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई
८) र-१ कार्यासन निवडनस्ती.